पुणे महानगर

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

## Pune metropolitan Regional Development Authority,Pune

स.नं. १५२ – १५३, महाराजा सयाजीराव गायकवाड उद्योग भवन, औंध, पुणे –४११०६७

S.No. 152-153, Maharaja Sayajirao Gaikwad Udyog Bhawan, Aundh, Pune – 411 067

Ph No. : 020- 259 33 344 / 356 / 333 / फोन. नं. ०२०- २५९ ३३ ३४४/ ३५६ / ३३३ Email: hqpmrda@gmail.com


---

# भागश: भोगवटा प्रमाणपत्र

**( मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र.७.६ नुसार )**

---

**जा.क्र : DP/बीएचए/मौ. लोहगांव/स.नं.२८८/१+२/१/२ व १+/२/२ /प्र.क्र.८००/१७-१८, दि. ०५/०७/२०१८**

**प्रति,**

श्री. दत्तात्रय गुलाबराव खांदवे
रा- कोपर आळी, वडगांव-शिंदे रोड, पुणे-४७

मौजे- लोहगांव, ता- हवेली. जि- पुणे. येथील स.नं. २८८/१+२/१/२ व १+/२/२ चे क्षेत्र- १४,३९२.१२ चौ.मी. या जागेवर इमारतीचे बांधकाम करण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांनी आदेश क्र. पमह/एनए/एसआर/१०१७/२०१४, दि-२४/०२/२०१५ अन्वये आपणास परवानगी देण्यात आली आहे.

उपरोक्त परवानगी प्रमाणे आपण श्री. जय एरम लायसन्स नं. CA/९३/१५८११ परवानाधारक वास्तुविशारद यांच्या देखरेखीखाली इमारतीचे बांधकाम पूर्ण केले असलेबाबत व या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज केल्यावरुन आपणास खालील इमारतींना सोबतच्या परिशिष्ट ' ब ' मध्ये नमूद केलेले अटींस अधिन राहून अंशत: भोगवटा करणेस संमती देण्यात येत आहे.

**उपयोगात आणावयाच्या इमारतीचे वर्णन**

| अ.क्र. | इमारत | मजले | सदनिका |
|---|---|---|---|
| १) | ए | B+P+९ मजले | ९० |

मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे / पु म प्र वि प्रा

**महानगर आयुक्त,**
**तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**पुणे यांचे करिता**

**प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.**

१) ग्रामसेवक, मौजे-लोहगांव, ता-हवेली, जि-पुणे. यांना माहितीसाठी व घरपट्टी आकारणीसाठी.

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडील दि-०५/११/२०१८ रोजीचे पत्र क्र. ८००/१७-१८ सोबतचे**

## परिशिष्ट ' ब '

१) अर्जदार /सदनिका धारक यांना उक्त इमारतींमधील सामाईक जागा उदा. रेफ्युज एरिया, सामाईक पार्किंग, टॉप टेरेस इ. बंदिस्त करता येणार नाही. अथवा विकता येणार नाही. सदरचे क्षेत्र सर्व लोकांसाठी खुले ठेवणे अर्जदारांवर बंधनकारक राहील.

२) अर्जदार / सदनिका धारक यांना सदनिका लगतचा दोन मजले उंचीचा टेरेस बंदिस्त करता येणार नाही.

३) रेखांकनातील रस्ते, गटारे, खुली जागा इत्यादी अर्जदारांनी सदनिका वितरित करण्यापूर्वी जागेवर स्वखर्चाने व समाधानकारकरित्या विकसित करणे आवश्यक आहे.

४) प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील नियम क्र. ७.१ नुसार सदर प्रकल्पाचे बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीनुसार करणेची तसेच भारतीय प्रमाणकानुसार सुरक्षिततेच्या सर्व निकषांचे पालन करुन नियोजित बांधकाम करणेची संपूर्ण जबाबदारी जमिनमालक/विकासक यांची असून प्रस्तुत प्रकरणी अर्जदार / जमीन मालक/ विकासक श्री. दत्तात्रय गुलाबराव खांदवे यांनी दि-२६/१०/२०१८ रोजी रुपये- ५००/- स्टॅम्प पेपरवर तसे नोटराईज्ड् हमीपत्र सादर केलेले आहे. त्यास अधिन राहून भोगवटा /अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

५) बांधकाम मंजूरीच्या आदेशातील तसेच अकृषिक परवानगी आदेशातील सर्व अटीं व शर्ती अर्जदार/ विकासक/जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहतील.

६) विषयांकित जागेतील उर्वरित इमारतींचे बांधकाम मंजूर नकाशानुसार पूर्ण करुन त्यास भोगवटा प्रमाणपत्र घेणे अर्जदार /मालक/ विकासक यांचेवर बंधनकारक आहे.

७) प्रस्तुत गृहप्रकल्पाकरिता सक्षम प्राधिकरणाने /ग्रामपंचायतीने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा न केल्यास या गृहप्रकल्पातील सदनिका हस्तांतरणापूर्वी पिण्याच्या पाण्याची आवश्यक ती पुर्तता स्वखर्चाने करणे अर्जदार /जमीन मालक/ विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे
पु म प्र वि प्रा

मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने

**महानगर आयुक्त,**
**तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**पुणे यांचे करिता**